UPA
IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रीच्या स्त्रीवादाचे निराळेपण

**प्रा. ममता राऊत**
जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा
८८५७९४४७०३
mamtaraut74@gmail.com

महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची सुरूवात करून जे क्रांतीकार्य केले याच क्रांतीकार्यात दलित स्त्रियांनाही त्यांनी स्त्री शिक्षणाची दारे खुली केली होती. यातील पहिली दलित लेखिका म्हणून जिचा उल्लेख केला जातो ती म्हणजे ''मुक्ता साळवे'' हीने ''आम्हा महार मांगाच्या धर्म कोणता'' या निबंधातून दलित स्त्रियांच्या वाट्याला आलेले दु:ख वेदना आणि अनुभव हे उच्चवर्णीय स्त्रियांच्या अनुभवापेक्षा कसे वेगळे आहे हे सांगितले आणि दलित स्त्रीवादाच्या वेगळेपणाला वाचा फोडली.

भारतीय पुरूष प्रधान समाज व्यवस्थेत पिढ्या न् पिढ्यापासून रंगड्या अंध चालीरीती, बेगड्या धर्मांध रूढी—परंपरा यांच्या जाचक दास्याला स्त्री जखडली गेली होतीच परंतु दलित स्त्रीच्या वाट्याला हे शोषण दुप्पट पटीने आलेलं होतं. तिचं जाती धर्माच्या नावानं तिच्यावर अस्पृश्यत्व लादून तिला पदोपदी अपमानास्पद जीवन जगायला भाग पाडत होते. ह्या वेदनेची कोंडी फोडणारी महात्मा फुलेची पहिली विद्यार्थीनी १४ वर्षाची असतांना पहिली दलित स्त्रीवादी लेखिका म्हणून मुक्ता साळवे व्यक्त झाली.

खऱ्या अर्थाने ब्रिटीश काळातील आणि पेशवे काळातील अस्पृश्यांच्या परिस्थितीचं तत्कालीन स्त्री जीवनाचे वेदनेचे सखोल चिंतन करून विश्लेषण करून चिकित्सक दृष्टीने व्यवस्थेला सडेतोड प्रश्न विचारण्याचे धाडस इतक्या लहान वयात मुक्ता साळवे यांनी केलेलं आहे. तिच्या ह्या धाडसाला समस्त स्त्रियांनी सलाम केलेला आहे. बहुजन दलित स्त्रियांच्या ह्या दुहेरी दु:खाला वाचा फोडतांना ती स्वार्थी, ढोंगी, लुबाडू पंडिताला म्हणते की, ''हे पंडित हो तुमचे स्वार्थी आपलपोटे पांडित्य पूजे साहित्य एकीकडे गुंडाळून ठेवा आणि मी सांगते ह्याकडे लक्षपूर्वक ऐका ज्यावेळेस आमच्या स्त्रीया बाळंत होतात त्यावेळेस त्यांच्या घरावर छप्पर सुध्दा नसते. म्हणून हिव पाऊस व वारा यांच्या उपद्रवामुळे त्यास किती दु:ख होत असेल बरे ह्याचा विचार स्वत:च्या अनुभवावरून करा'',[१] असा सवाल करून ती एकंदरीत दलित स्त्री शोषणाकडे सर्वांचे लक्ष वेधते.

जातीयता, धर्मांधता, सामाजिक विषमता, जाचक रूढी परंपरा, लिंगभेद या व्यतिरिक्त दलित स्त्रियांचे होणारे दुहेरी शोषण याविरूद्ध ती तत्कालीन धर्ममार्तंड व सनातन्या विरूध्द आवाज उठविते हे धाडस तमाम दलित महिलांच्या शोषणाविरूध्द रणशिंग होते.

१९६० च्या दशकांत दलितांचे प्रेरणास्त्रोत वंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळे व जन जागरणामुळे दलित साहित्याच्या रूपाने प्रखर क्रांतिवादी, परिवर्तनवादी आंबेडकरी चळवळ पुढे आली. या चळवळीतील साहित्यिकाने जोरकसपणे आपल्या वेदना व विद्रोहाला प्रकट केलेले आहे. दलित लेखकाच्या मनातील प्रक्षोभ दलित साहित्याच्या रूपाने जसा अविष्कृत झाला, त्याचप्रमाणे त्यांच्या एक दशकानंतर साधारणत: १९७० च्या आसपास दलित आंबेडकरवादी कवियत्रीने आपल्या वेदना विद्रोह व नकार प्रकट करायला सुरूवात केली किंवा आपल्या मनातील प्रक्षोभ व व्यथा आपल्या काव्य निर्मितीद्वारे प्रखरपणे मांडू लागल्या.

IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

दलित आंबेडकरवादी जाणिवांचा आत्मविष्कार करणाऱ्या कवियत्रीची जाणीव निश्चितच इतर सवर्ण स्त्रियांच्या जाणीवेपेक्षा भिन्न आहेत. अर्थातच आंबेडकरवादी कवी लेखकांच्या साहित्याचे प्रेरणास्त्रोत व उगम फुले–आंबेडकर होते. याला आंबेडकरवादी स्त्री कवयित्री सुध्दा अपवाद नाहित. डॉ. गंगाधर पानतावणे या संदर्भात आग्रहीपणे लिहीतात, ‘‘आंबेडकर विचार हा मानवी स्वातंत्र्याचा उद्‌गार आहे. जगात जेथे जेथे सामाजिक गुलामगिरी व पारतंत्र्य आहे तेथे हा विचार एखाद्या झंजावाता सारखा येतो आंबेडकर विचारपोथी निष्ठा नाकारतो आणि विज्ञाननिष्ठा स्वीकारतो आंबेडकर विचार देव दैव्य नाकारतो आणि दास्य मुक्तता स्विकारतो आंबेडकर विचारांच्या विद्रोह–वि ामतेशी, विदवेशाशी, वर्णवादाशी, उच्चनीचतेच्या कृत्रिम कल्पनांशी आहे. आंबेडकर विचारांचा विग्रह आहे मानसिक गुलामगिरीशी, धर्मग्रंथाशी, माणसाचे विभाजन करणाऱ्या कृर अनिती शास्त्राशी म्हणूनच दलित साहित्याचा प्रेरणास्त्रोत आहे–आंबेडकर विचार’’२.

वरील विवेचनाचा विचार करता लक्षात येते की, आंबेडकरवादी स्त्रियांच्या कवितेतूनही हे हुंकार निदर्शनास येतात. हेच आंबेडकरवादी, परिवर्तनवादी क्रांतिवादी विचार मूल्य आंबेडकरवादी स्त्रियांच्या कवितेचे मूळ स्त्रोत आहे.

दलित जाणिवांना वाचा फोडण्याचे कार्य खरे म्हणजे बाराव्या–तेराव्या शतकातच झालेले आहे. परंतु ते सौम्य स्वरूपात होते. संत सोयराबाई ने दलित स्त्रीच्या वाट्याला आलेले ही पण उपेक्षितपणा, दास्यत्व, विटाळाची अस्पृश्यत्व भावना ह्या अनेक दु:खाला तिने अभंगाद्वारे वाचा फोडली आणि अस्पृश्य म्हणून वाटायला आलेल्या दुहेरी शोषणाची वेगळेपणाची जाणीव तिने कितीतरी वर्षे आधी करून दिलेली होती.

संत चोखामेळा प्रमाणेच सोयराबाई नेही जाती त्वेषामुळे वाट्याला येत असलेले हीन–दिन पण अपेक्षीत, जिने याची व्यथा ती विठ्ठलापुढे मांडते.

‘‘आमचे सुख दु:ख कोण दुजा वारी
तुम्हीच श्रीहरि माय बाप ।
तुमच्या उच्छिष्टाची धरोनिया आस
बैसले रात्रंदिवस धरणेकरी
परी तुम्हा न ये आमुची करूणा
केधवा येईल मनात तुमचीया
काम क्रोध मदमत्सर वैरी
हे झडकरी वारी मायबापा
म्हणुनी धरीले तुमचे पाय
म्हणतसे सोयरा चोखीयाची ३

संत सोयराबाई च्या अशा अनेक अभंगावरून दलित स्त्रियांची व्यथा–वेदना तिचे दुहेरी शोषण याची दाहकता लक्षात येते. भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीचे मनुवादी परंपरावादी सनातनी धर्मांध रूढी परंपरेच्या नावाने कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक व लैंगिक असे सर्वच पातळ्यावर पिढ्यान् पिढ्यापासून सर्रास शोषण होत होते. परंतु ही सवर्ण ओबीसी स्त्री ज्या धर्माच्या परंपरेच्या नावाने तिला गुलाम बनविले जात होते तिला पदोपदी मंडित केले जात होते तरीपण ह्या व्यवस्थेचा व धर्माचा केवढा अभिमान बाळगत होती ती.

मात्र दलित आंबेडकरवादी स्त्री तशी नाही ती आंबेडकरी परिवर्तनवादी विचाराने प्रेरित होऊन व्यवस्थेने लादलेले हे रूढी परंपरेचे बोजे ती स्वत:च्या आत्मसन्मानासाठी सर्रासपणे नाकारते व त्या धर्मांध व्यवस्थेवर ती तुटून पडते. ती पुरूषांच्या बरोबरीने मानवी न्याय हक्काच्या आंबेडकरी क्रांतीवादी चळवळीची एक महत्वाची भाग होते.

आंबेडकरवादी कवियत्री ही सर्वच प्रकारच्या विषमतावादी वृत्तीला मुळातून नष्ट करू पाहते. या संदर्भात सुगंधा शेंडे यांची कविता लक्ष वेधणारी आहे.

''कणकण पिऊनी तव तेजाचा
रोम रोम तेजाळून यावा
या तेजाच्या प्रज्वलतेने
विलया न्यावे भेदभाव''

दलित आंबेडकरी विचारांची ज्योत सदैव तेवत राहावी अशी अपेक्षा ही कवयित्री व्यक्त करते. हिरा बनसोडे यांनी आपल्या परखड कवितांनी आंबेडकरी स्त्रीवादी कवितेत मानाचे स्थान मिळविले आहे. एक बहिष्कृत स्त्री म्हणून भोगावे लागलेले जीवंत अनुभव त्यांच्या काव्यातून अभिव्यक्त झाल्यावाचून राहत नाही. हिराबाई लिहीतात — ''ही माझी फिर्याद आमचे कर्मठ संस्कृतीवर आहे जिने आम्हाला बंद कोठडीत कैद केले आहे, जिथे आम्हाला बहिष्कृत आयुष्याचे दान आहे जिथला वारा आम्हाला परक्या सारखा वागवतो, जिथला पाऊस आम्हाला फक्त दुष्काळच देतो''[४]

हिरा बनसोडे यांनी एकुणच आंबेडकरवादी स्त्री वेदनेचा जागर केला आहे. स्त्रीमुक्तीचा आवेश व भडका त्यांच्या समस्त कवितेतून सातत्याने प्रखरपणे प्रकट होत असतो. सुगंधा शेंडे व हिरा बनसोडे यांनी स्वातंत्र्याआधी आंबेडकरवादी स्त्री वेदनेचे भकास वास्तव समस्त समाजासमोर पुढे आणले. स्वातंत्र्यानंतर याच जाणिवेकडून आंबेडकरवादी स्त्री कवियत्रीने अधिक जोरकसपणे प्रखरपणे कविता लिहील्या.

स्वात्रंत्र्यानंतर समाजात अनेक उलथापलथी झाल्या. समाजजीवनात झपाट्याने बदल घडवून आले. शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक क्रांती होऊ लागली. वैज्ञानिक दृष्टिकोनात वृध्दिंगत होऊ लागला. लोकशाही स्वातंत्र्य समतेचे वारे फिरू लागले. मात्र समाजात स्त्रीकडे बघण्याचा दृ टकोन स्त्रीचे नगण्य स्थान आणि दलित स्त्री म्हणून वाट्याला येणारे विविध स्तरावरील शोषण हे मात्र बदलू शकले नाही हेच भेदक वास्तव दलित आंबेडकरवादी स्त्री कवयित्रीने प्रकर्षाने आपल्या आंबेडकरवादी कवितेतून व्यक्त केले आहे.

फुले आंबेडकरी विचारांच्या सम्यक ज्ञानाने प्रेरित होऊन लिहीणारी दया पवारांच्या वास्तवदर्शी विचाराचे बाळकडू मिळालेली, दलित स्त्री शोषणाचे वास्तव प्रज्ञा दया पवार या कवयित्रीने अनुभवलेले वास्तविक मर्मभेदक सत्य आपण नाकारू शकत नाही. आंबेडकरी स्त्रियांचे वेदनेचे, शोषणांचे वेगळेपण साकार करतांना प्रज्ञा पवार लिहीतात — ''सर्वसाधारण स्त्री या हिंदू संस्कृतीच्याशिवाय मानसिक गुलामगिरीचा शिकार असतात. स्वत:चे अस्तित्व विसरून पतीच्या समाधानातच धन्यता मानायचे असतात. एक व्यक्ती म्हणून स्वत:ची त्यांना ओळख पटावी आणि खऱ्या अर्थाने त्यांचा मानसिक विकास व्हावा यासाठी फुले—आंबेडकरांच्या साहित्याच मर्म जाणून घेतल्याशिवाय त्यांना पर्याय नाही हे मला उमगलं''[५]

प्रज्ञा पवार यांच्या विवेचनावरून लक्षात येते की, आंबेडकरी विचार प्रेरणास्त्रोतातून न्हाऊन—उजळून निघालेली आंबेडकरवादी विचारवंताची स्त्री जाणीव व इतर स्त्रियांची स्त्री जाणीवेपेक्षा निश्चितच वेगळी

आहे. दलित स्त्री म्हणून अनुभवलेले वंचितांचे उपेक्षितांचे जीवन, धर्म, भेद, लिंगभेद यांचे सतत चालणारे आघात, मनावर खोल जखम करणारे चटके, स्वातंत्र्यानंतर बदलत्या विचार प्रवाहाचा सामाजिक दांभिकपणा, आंबेडकरवादी कवयित्रीने निर्भीडपणे त्यांच्या काव्यात रेखाटलेले आहे.

आंबेडकरी स्त्रीवादी चळवळीच्या मुख्य प्रवाहात प्रभावीपणे लेखन करणारी कवियत्री, ज्योती लांजेवार यांनी सुध्दा समग्र शेतीत स्त्री आणि अस्पृश्य स्त्री म्हणून वाट्याला आलेली भोगवादी दुहेरी वेदना चित्रित करतांना त्या लिहीतात —

''आता मी भडकवणार आग माणुसकीच्या हक्कासाठी,
मला पातकी की म्हटलं तरी चालेल,
वाटत हातात कोलीत घ्यावं, अन् लावावी आग या माणसांच्या
वस्तीला जिथे आपल्या सर्वस्वाची होळी झालीय''[६]

लिंगभेद रूपी मानसिकतेने पीडित असलेली स्त्री आणि दलित स्त्री म्हणून भोगत असलेले अमानुष वर्तन, किती भेदक आहे याची तीव्र चीड ज्योती लांजेवार यांनी व्यक्त केली आहे. स्त्रियांच्या जीवनाची होळी करणाऱ्या त्या षंड दानवी, अमानवी मानसिकतेवर तुटून पडतात व विद्रोह करतात. त्यांचे शब्द म्हणजे एक धारदार शस्त्र वाटतात हे वेगळेपण इतर स्त्री कवयित्री व आंबेडकरवादी कवयित्री यांच्यात जाणवल्यावाचून राहत नाही. सुरेखा भगत यांनी ''साक्ष'' या पहिल्याच काव्यसंग्रहात सभोवतालची व्यथा मांडली आहे त्या लिहीतात, —

''जिथे दिशांच्या येतो आक्रोश कानावर,
तेथील मुक्याची अगतिकता साहू चल तिथे जाऊ,
ज्यांच्या म्हणी दु:खाचे सावट,
त्यांच्या अंत:करणी प्रीतीची फुंकर घालू चल तेथे जाऊ''[७]

एकूणच सुरेखा भगत यांची कविता दुखमुक्तीच्या मार्गाकडे वाटचाल करते. स्त्रियांचे दु:ख कसे दूर करता येईल याचा विचार करते आणि दलित स्त्री म्हणून जे दुहेरी शोषण तिच्या वाट्याला येत असते ते मुळातूनच थांबले पाहिजे अशी आग्रही भूमिका त्यांची आहे.

आंबेडकरी स्त्री कवयित्रीच्या मुख्य प्रवाहातील कवियत्री प्रज्ञा लोखंडे आपल्या ''अंतस्थ'' या काव्यसंगहाद्वारे स्त्रीमुक्तीचा जोरकसपणे पुरस्कार केलेला आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनवादी, क्रांतीदर्श विचारांची ज्योत तिने सदैव आपल्या कवितेच्या रूपाने तेवत ठेवली आहे. ज्याप्रकारे आंबेडकरवादी विचारांना रूढी—परंपरा, धर्मांध कल्पना, अंधश्रध्दा मान्य नाही हेच विचार सूत्र त्यांनी आपल्या कवितेत जोपासले आहे. २० व्या शतकातही ह्या अंधश्रध्देची व धर्मांध परंपरेसाठी दलित स्त्री जेव्हा बळी जाते तेव्हा प्रज्ञा लोखंडे आपली तडफड कवितेच्या रूपाने व्यक्त करतात. ''स्त्रित्वाचा मुक आक्रोश सजवण्यात धन्य झालेली आपली महान संस्कृती जोहरा पासून सतीपर्यंतचा हा प्रवास एक्कीसवी सदीत तसूभरही बदलला नाही रूपकुंवर''[८]

आपण जोपर्यंत संघटित होऊ शकत नाही तोपर्यंत बहुजन स्त्रियांचे दु:ख त्यांच्यावर होणारे अन्याय थांबू ाकत नाही. काळ परिस्थिती बदलत आहे परंतु या आधुनिक विज्ञान युगातही माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना आहे. याकरिता आंबेडकरवादी स्त्री चळवळीला एकत्रित लढा देण्याची गरज आहे ही कळकळ प्रज्ञा लोखंडे व्यक्त करतात.

स्त्रीची विटंबना करणाऱ्या या बेगडी रूढी–परंपरा समूळ नष्ट व्हाव्या आणि आंबेडकरी स्त्रीमुक्तीची क्रांतीज्योत सतत प्रज्वलित रहावी म्हणून कवियत्री नंदा तायवाडे यांनी ‘‘दोस्तहो’’ ह्या कवितेद्वारे समस्त शोषित दलित स्त्रियांना त्या आस्वस्थ करीत आहेत त्या लिहीतात,

‘‘दोस्त हो,
मनु संस्कृती अन पुरू ष संस्कृतीच्या
दुहेरी बंधनातून
आता आमचा जुलूस मशाल झाला आहे.
आम्ही म्हणजे संगिनी
संग्रामात स्वत:ला झोकून देणाऱ्या
आमची शालीनता आता दाहकता झाली आहे
आम्हीही बनलोत आता रणरागिनी
हा विटाळलेला अंधार पेटवण्यासाठी’’

मनुवादी आणि पुरू षसत्ताक वादी संस्कृतीवर मशाल होऊन पेटण्याची आणि शोषित बहुजन स्त्रियांनी आता शालीनता सोडून दाहकपणे या संग्रामात उतरण्याची सशक्त गरज आहे असे परिवर्तनवादी सशक्त विचार त्या मांडतात आता आम्ही ‘‘रणरागिनी’’ झाल्याचे त्या बोलतात.

दलित आंबेडकरी ‘स्त्री जेव्हा दुहेरी शोषणाला सामोरी जाते तेव्हा संध्या तांबे यांची ‘‘गावकुसाच्या वेशीपाशी’’ ही कविता वास्तवितकतेचे बोलके चित्रण करते.

‘‘गाव कुसाच्या वेशीपाशी अजुनी लाल रक्तलाट
धुवट जरी आठवणी थरथरते पायवाट
जातीच्या शब्दांची, डसते आंधील माशी
प्रश्नचिन्ह उमटते गाभुळ्या आकाशी’’

हेच आंबेडकरी स्त्रीवादी कवितेचे वेगळेपण आहे. अशीच प्रगल्भ कविता, दलित स्त्री मनाचा आकांत फोडणारी, तिला गुलामगिरीच्या बेड्यात जखडून ठेवणारे मुखपवट्यातील वापदाला शोधू पाहणारी प्रतिभा राजानंद यांची आहे.

‘‘संपू पहातेच मी या चक्रव्युहाला
छेदन्या अन् भेदन्यातच
माझ्या स्त्रीत्वांन ओढलेल्या आणि वेढलेल्या
कुणाकुणाला टाळण्या फेटाळण्यात खर्च करावं सामर्थ्य
ही असुरक्षितता नकोय रे
माझ्या विचार शक्तीला सीलबंद करू पाहणाऱ्या
या महान संस्कृतीची शपथ
पार पोलीओग्रस्त बनवतय माझं स्त्रीत्व मला’’.

हा आकांत आपल्या महान संस्कृतीने त्या कष्टकरी शोषित वंचित स्त्रिवर केलेल्या बळजबरीचा आहे तिला परावलंबी बनविणाऱ्या त्या रूढीवादी, विषमतावादी मानसिकतेचा आहे हा आकांत करून कवयित्री थांबत नाही तर ती विद्रोह करू पाहत आहे.

जातीयवादाचे वि ारी कडु अनुभव आणि अस्पृश्यपणाचे कलंकित दु:ख हे सर्वच आंबेडकरवादी स्त्री कवयित्रीच्या कवितेचे वेगळेपण आहे. अस्पृश्यतेच्या दु:खाबरोबरच स्त्री म्हणून भोगाव्या लागणाऱ्या यातना ह्या कवयित्री मांडतात तेव्हा मन अस्वस्थ होते अशीच अस्वस्थता निर्मला लोंढे यांनी व्यक्त केली आहे. त्या लिहीतात –

''इथे खावी लागतात अग्नीकाष्ट
पतिव्रतेचा – अन् सतीला जावं लागतं अग्निदिव्यातून
आजच्या सती ची पती राम
मदिरा आणि मंदिराक्षीचे आहारी
धुंडाळतो सुगंधी कट्‌टे''

आजच्या समकालीन वास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण कवयित्री करते. ही असुरक्षित समाजव्यवस्था इथे मुखवटे धारण केलेल्या पिशाच्य नजरा स्त्रीला असुरक्षित भयग्रस्त जीवन जगण्यास कसे भाग पाडते हे ही प्रत्ययास आल्या वाचून राहत नाही.

आंबेडकरी चळवळीशी आपले नाते जोडणारी आणि फुले आंबेडकरांच्या प्रेरणानी नवजीवन, नवचैतन्य, आशावाद स्वातंत्र, समता व न्याय या तत्वाला खऱ्या अर्थाने अंगीकृत करणारी दलित आदिवासी कवयित्री म्हणजे उषाकिरण आत्राम यांच्या ''म्होरकी'' या कवितासंग्रहाद्वारे त्यांनी रानावनात राहणाऱ्या स्त्री आदिवासी जीवनाचे अत्यंत भेदक व वास्तविक चित्रण केलेले आहे. ती क्रांतिकारी बिरसा मुंडा लाच उद्‌देशून लिहीते.

''इथं सूर्य अजूनही नाही रे पोचला बिरसा
सूर्य कमळांचा तलाव नाहि रे फुलला
अंधारात एकेका रात्री
किसून निघतो रे एक एक जीव
काकडी कंदासारखा''[९]

ज्याप्रमाणे दलित स्त्रीची वेदना, पीडा अन्य वर्गातील स्त्रीच्या तुलनेत दुहेरी आहे. त्याचप्रकारे आदिवासी भगिनींची ही वेदना, त्यांच्यावर होणारे शोषण यांचेकडे दुर्लक्ष करण्यासारखे नाही. उषाकिरण आत्राम नुसतेच कैफियत मांडत नाही तर आपल्यावर चालविलेल्या मक्तेदारी आम्हीच उलथून पाडू अशी निर्वाणीची भूमिका त्यांची आहे ती आपल्या रंजल्या–गांजल्या सख्यांना म्हणते –

''सख्यांनो निर्धार करूया, आपण सावित्री फुले होऊया
रणांगणा दुर्गा झाशीची झलकारी होऊया
आदिमाची शक्ती होऊया, दलितांची माय होऊया
दऱ्याखोऱ्यातील पिडीतांची सावली होऊया
दु:खी कष्टकरी अबलांची साय होऊ या
स्त्री अत्याचाराची सखी होऊ या''[१०]

उषाकिरण आत्राम यांच्या कवितेची नाळ आंबेडकरी कवितेच्या जाणिवेची जुळलेली आहे हेच त्यांच्या कवितेचे वेगळेपण आहे. दलित बहुजन समाजातील स्त्रीयांनी भोगलेले शोषलेले अनुभव आंबेडकरवादी स्त्री कवयित्रीने अत्यंत जाज्वल्य शब्दांत अविष्कृत केलेला आहे. एक स्त्री म्हणून लिंग

भेदाचे दहाक वास्तवाला सामोरे जात असतांना 'दलित स्त्री' म्हणून पदोपदी उपेक्षित अपमानित होऊन जगणे हे दुहेरी शोषण मुकपणे आंबेडकरवादी स्त्रियांना सहन करावे लागत असे हे वरील कवयित्रींच्या काव्यातून निदर्शनास येते.

या कवयित्रीने आंबेडकरी क्रांतीदर्श विचार तिच्या प्रेरणेचा ऊर्जास्त्रोत स्वत:च्या अंतरंगात कायम कोरून ठेवला असून तिच्या वेदनेबरोबर विद्रोहाचा परिवर्तनाचा वसा जपलेला आहे. स्त्रीमुक्तीचा ध्यास समस्त आंबेडकरवादी कवियत्रींना लागलेला आहे. परिवर्तनाची आग मनात पेटत आहे. तर जातीय आणि लिंगभेद विषमता समूळ नष्ट व्हावी यासाठी आंबेडकरवादी स्त्रीशक्तीरूपी या कवितांचा बुलंद आवाज आहे.

शाहू–फुले–आंबेडकर यांनी सुरू केलेली स्त्री मुक्ती चळवळीशी या कवियत्रीचे रक्ताचे नाते आहे. सावित्रीबाई फुले यांच्या क्रांती लढ्याचे ह्या पाईक आहेत. सावित्रीचा वसा जपणाऱ्या या आंबेडकरवादी कवियत्रीने समस्त स्त्री जातीच्या मानवमुक्तीचा जाहीरनामाच गाईला आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर जागतिक पातळीवर स्त्रीवादाच्या चळवळीला अधिक जोर आलेला आहे. या सर्व चळवळीच्या मुळाशी फुले–आंबेडकरांची प्रेरणा आहे. ह्या विचार क्रांती शिवाय स्त्रीवादाच्या चर्चा पूर्ण होऊ शकत नाही. फुले आंबेडकरांनी बहुजन स्त्रीच्या मानव मुक्तीची शोषण मुक्तीची ज्योत लावली हीच ज्योत प्रज्वलीत ठेवण्याचे धाडसी क्रांतिकार्य आंबेडकरवादी स्त्री कवियत्रीने केलेले आहे. हेच वेगळेपण ह्या आंबेडकरवादी स्त्री कवयित्रीचे आहे.

**संदर्भ सूची :–**


१. मंगला आठलेकर, महापुरूषांच्या नजरेतून स्त्री, ज्ञानोदय, १८५५
२. डॉ. मनोहर जाधव, संपा. 'साहित्य शोध आणि संवाद', सुविधा प्रकाशन पुणे, ऑगस्ट २००८, पृ. क्र. ३३
३. हेमंत इनामदार, ल. रा. नाशिराबादकर, 'महाद्वाराच्या पायरीशी', हेमंत प्रकाशन कोल्हापूर, १९९०
४. डॉ. यशवंत मनोहर, आंबेडकरवादी मराठी साहित्य, भिमरत्न प्रकाशन, नागपूर–१९९०
५. तत्रैव, डॉ. यशवंत मनोहर
६. सुरेखा भगत, साक्ष, प्रशांत प्रकाशन, बुलढाण सप्टेंबर १९९४
७. तत्रैव, सुरेखा भगत
८. डॉ. यशवंत मनोहर, उ.नि.
९. उषाकिरण आत्राम, म्होरकी, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर, २२ फेब्रुवारी १९९७
१०. तत्रैव, उषाकिरण आत्राम